पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १८६ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | रविवार ०२/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# भंडारदरा धरणातून प्रवरा पात्रात ४४२७ क्युसेकने विसर्ग सुरू



छाया– विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

भंडारदरा - पावसाचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या भंडारदऱ्याच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असून शुक्रवारी भंडारदऱ्यात धुवाधार पाऊस कोसळल्याने भंडारदरा धरणामधून ४४२७ क्युसेक विसर्ग प्रवरा नदीमध्ये सोडण्यात आला आहे. पावसाचा अंदाज बघून प्रवरा नदीमध्ये आणखी पाणी सोडण्यात येणार असल्याचे संकेत भंडारदरा धरण शाखेकडून देण्यात आले आहेत.

अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाणलोटात गत १५ दिवसांपासून जोरदार पाऊस कोसळत आहे. मध्यंतरी एक-दोन दिवस पावसाने विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे भंडारदरा धरणाच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास सुरुवात झाली असून भंडारदरा धरणाच्या सांडव्यामधून प्रवरा नदीमध्ये पाणी विसर्जित करण्यात येत आहे. अहिल्यानगरची चेरापुंजी समजल्या जाणाऱ्या घाटघरला अतिवृष्टी सुरूच आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे रतनवाडीची प्रवरामाई दुथडी भरून वाहत असल्याने गत २४ तासांत भंडारदरा धरणात २२२ दलघफू पाण्याची नवीन आवक झाली. तर भंडारदरा धरणाचा पाणीसाठा शनिवारी सकाळी ६ वाजता १०३१३ दलघफुटांवर पोहोचला आहे. भंडारदरा धरण सध्या ९३.४२ टक्के भरले आहे. धरणाच्या पाणलोटात भात लागवडीला जोरदार वेग आला असून शेंडी येथील बाजारपेठेत शुक्रवारी शुकशुकाट जाणवला. तर पडणाऱ्या पावसामध्ये भिजण्याचा आनंद घेण्यासाठी भंडारदऱ्याला पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

गत २४ तासांमध्ये भंडारदरा येथे १३ मिमी, पांजरे १९ मिमी, रतनवाडी ४३ मिमी, तर घाटघर येथे ५५ मिमी पावसाची नोंद झाली. निळवंडे धरणाचा पाणीसाठाही ७५८४ दलघफू झाला असून निळवंडे धरण ९१ टक्के भरले आहे. निळवंडे धरणामधून ७४३६ क्युसेकने विसर्ग सुरू आहे. भंडारदरा धरणामधून सांडव्याद्वारे ७,१३२ क्युसेक व धरणाच्या वीजनिर्मिती केंद्रामधून ७८० क्युसेक (किंवा ८१९ क्युसेक) असा एकूण ७,९१२ क्युसेकने पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आल्याची माहिती धरण शाखेकडून देण्यात आली आहे.

## तुमच्याही ट्रोल गँगला आवरा
### दुसऱ्यांनाही आया-बहिणी असतात - राज ठाकरे



मुंबई (वृत्तसंस्था)

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या २० व्या वर्धापन दिन सोहळ्यात केंद्र सरकार, भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्य सरकारवर निशाणा साधला. जेन-झी पिढीच्या प्रश्नांपासून शिक्षणव्यवस्था, ट्रोल संस्कृती, बेरोजगारी आणि चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्यांपर्यंत अनेक मुद्द्यांवर त्यांनी परखड भूमिका मांडली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच एका व्हिडिओत तरुणांनी वापरलेल्या चुकीच्या भाषेवर चिंता व्यक्त करत त्यांना माफ केल्याचे म्हटले. यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले की, कुणाबद्दलही खालच्या थराची भाषा वापरणे चुकीचेच आहे, मान्य आहे. पण, याची सुरुवात गेल्या १२ वर्षांत भाजपच्याच ट्रोल आर्मीने केली. नेहरू, इंदिरा गांधींपासून ते आमच्यापर्यंत सर्वांना ट्रोल करण्यासाठी प्रत्येक राज्यात ही लोकं बसवली आहेत. पंतप्रधानांना माझे सांगणे आहे की, दुसऱ्यांनाही आया असतात. त्यामुळे तुमच्या पक्षातील लोकांनाही मर्यादा पाळायला सांगा. तुम्ही मुलांना माफ केले, पण जंतरमंतरवर विद्यार्थ्यांची डोकी फोडण्याचे आदेश देणारे कधी माफी मागणार? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला.राज ठाकरे म्हणाले, रस्त्यावर उतरलेले विद्यार्थी केवळ 'नीट' पेपरफुटीमुळे संतापलेले नाहीत, तर ते केवळ एक निमित्त आहे. या रौद्र रूपामागे आजूबाजूला साचलेले निराशाजनक वातावरण कारणीभूत आहे. मुलांना खेळायला मैदाने नाहीत, नोकऱ्या नाहीत, सर्व कंपन्या खासगी उद्योगपतींच्या घशात घातल्या जात आहेत आणि देशात फक्त निवडणुका आणि आमदार-खासदार फोडण्याचे राजकारण सुरू आहे,अशी खंत त्यांनी व्यक्त केली. राज ठाकरे म्हणाले, आम्ही टेलिग्रामपासून ते थेट इन्स्टाग्रामपर्यंतचा बदलता काळ पाहिला आहे. 'ऋशप-न' म्हणजे केवळ मुंबई-पुण्यात राहून इंग्रजी बोलणारी मुले नव्हेत, तर ही १९९७ नंतर जन्मलेली पिढी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही आहे. जुन्या कल्पना सोडून त्यांच्या अपेक्षा समजून घेण्याची आज नितांत गरज आहे. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर राज ठाकरेंनी निशाणा साधला.

# याचिका केवळ सुनावणीसाठी स्वीकारली

## जनतेचा कौल हाच आपला विजय - आ. खताळ



**कार्यक्रमात आमदार अमोल खताळ यांनी राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना, मतदारसंघातील सुरू असलेली विकासकामे, प्रशासनातील बदल आणि भविष्यातील विकास आराखड्याचा आढावा घेत विरोधकांवर अप्रत्यक्षपणे जोरदार टीका केली. न्यायालयीन प्रक्रियेवर भाष्य करताना त्यांनी न्यायपालिकेवर पूर्ण विश्वास व्यक्त केला, तर जनतेने दिलेला कौलच सर्वोच्च असल्याचेही ठामपणे सांगितले. विशेष म्हणजे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता केलेल्या टीकेमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - न्यायालयाने संबंधित याचिका केवळ सुनावणीसाठी स्वीकारली असून, त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. मात्र काही जणांना पुन्हा आमदार किंवा मुख्यमंत्री होण्याची स्वप्ने पडू लागली आहेत. मात्र संगमनेरच्या जनतेने दिलेला कौल हा अंतिम असून, तोच माझ्या विजयाचा खरा आधार आहे, अशी टीका आमदार अमोल खताळ यांनी माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता केली.

संगमनेर येथील मालपाणी लॉन्स येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जन्मदिनाचे तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्वराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते .त्यावेळी आमदार खताळ यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. व्यासपीठावर संगमनेर उपविभागाचे प्रांत अधिकारी अरुण मुंडे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, महावितरणचे कार्यकारी (पान ४ वर)

## वेल्हाळे येथील दरोड्याचा गुन्हा उघड
### दोघे ताब्यात, मुख्य आरोपी फरार

संगमनेर (प्रतिनिधी) -

तालुक्यातील वेल्हाळे (हरीबाबावाडी) येथे १२ जुलै रोजी झालेल्या घरफोडी व दरोड्याच्या गंभीर गुन्ह्याचा अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावत दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. हे या प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय उंबऱ्या काळे हा यापूर्वीही मोक्कासह अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये ने. फरार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

याबाबत गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, १२ जुलै रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास गणेश गोकुळ चव्हाण कायांच्या वेल्हाळे येथील राहत्या घरात पाच अनोळखी चोरट्यांनी प्रवेश केला. त्यांच्या भावावर लोखंडी कुऱ्हाडीने वार करून कुटुंबातील इतर सदस्यांना मारहाण केली. त्यानंतर घरातील सुमारे २ लाख ९० हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि - दोन मोबाईल असा ऐवज लंपास केला. याप्रकरणी संगमनेर शहर - पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा - दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीष भोये, पोलीस अंमलदार विष्णू भागवत, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळू खेडकर, सुनील मालणकर, किशोर शिरसाठ व अरूण मोरे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान अक्षय उंबऱ्या काळे (वय २६) व तेजस सगड्या काळे (वय १९, दोघे रा. सुरेगाव, ता. श्रीगोंदा) यांना वाघुंडे (ता. पारनेर) येथून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत अक्षय काळे याने साथीदार सगड्या उंबऱ्या काळे, शरद कैलास काळे, आवेश मिरफा भोसले आणि (पान ३ वर)

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# 'कडलग इन्व्हेस्टमेंट'च्या आर्थिक साक्षरता कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद






युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - 'कडलग इन्व्हेस्टमेंट'तर्फे आयोजित विशेष आर्थिक साक्षरता कार्यशाळेला संगमनेर आणि परिसरातील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. गुरुवारी, ३० जुलै रोजी 'मालपाणी हेल्थ क्लब' येथे पार पडलेल्या या कार्यशाळेत दोन तासांहून अधिक काळ श्रोते मंत्रमुग्ध झाले. सहभागींनी आर्थिक नियोजन, संपत्ती निर्मिती आणि आर्थिक जागृती या विषयांवरील माहितीपूर्ण सत्राचा लाभ घेतला.

कार्यशाळेचे मुख्य मार्गदर्शन सुरत (गुजरात) येथील प्रसिद्ध प्रशिक्षक, प्रेरणादायी वक्ता आणि आर्थिक विषयातील तज्ज्ञ पलक शाह यांनी केले. त्यांनी सोपी भाषा, व्यावहारिक उदाहरणे आणि दैनंदिन जीवनातील दाखल्यांच्या माध्यमातून आर्थिक शिस्त, ध्येय-आधारित गुंतवणूक, महागाईचा परिणाम, चक्रवाढ व्याजाची **(compounding)** ताकद, बाजारातील चढ-उतार, पद्धतशीर गुंतवणूक (SIP), वारसा नियोजन (legacy planning), मृत्युपत्राचे महत्त्व, विश्वासू आर्थिक सल्लागाराची भूमिका आणि प्रत्येक व्यक्तीतील आर्थिक क्षमता ओळखण्याचे महत्त्व यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. ओमप्रकाश सिकची यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर 'एनजे वेल्थ'चे (NJ Wealth) विभागीय प्रमुख विक्रमसिंह परदेशी, ज्येष्ठ लेखापरीक्षक (ऑडिटर) सोपानराव देशमुख, 'कडलग इन्व्हेस्टमेंट'चे संस्थापक सुनील कडलग, आदित्य कडलग तसेच उपक्रमशील मुख्याध्यापिका वृषाली कडलग हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी उद्घाटक डॉ. ओमप्रकाश सिकची यांचा सत्कार दैनिक युवावार्ताचे संपादक किसन हासे यांचे हस्ते तर प्रमुख वक्ते पलक शाह यांचा सत्कार उद्योजक सुदीप वाकळे यांच्या हस्ते करण्यात आला.

'कडलग इन्व्हेस्टमेंट'ने गाठलेले महत्त्वाचे टप्पे - जसे की विश्वासार्ह संपत्ती व्यवस्थापन सेवेची दोन दशके पूर्ण करणे, व्यवस्थापनाखालील मालमत्तेचा (AUM) टप्पा २०० कोटी रुपयांच्या पुढे नेणे आणि मासिक एसआयपी ( SIP ) बुक

२ कोटी रुपयांहून अधिकच्या टप्प्यावर नेणे - यांच्या निमित्ताने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे उपस्थितांचा उत्स्फूर्त सहभाग. हे सत्र दोन तासांहून अधिक काळ चालले, तरीही एकही उपस्थित व्यक्ती सभागृहातून बाहेर गेली नाही. सादरीकरणादरम्यान सांगितलेल्या प्रत्येक व्यावहारिक उदाहरणाला उपस्थितांनी उत्साहाने प्रतिसाद दिला आणि ते संपूर्ण वेळ सक्रियपणे सहभागी राहिले. अनेक उपस्थितांनी नंतर असे नमूद केले की, या कार्यशाळेमुळे पैशांचे व्यवस्थापन आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनच बदलला.

कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, 'कडलग इन्व्हेस्टमेंट'सोबत शिस्तबद्ध गुंतवणूक करून महत्त्वाचे आर्थिक टप्पे यशस्वीपणे गाठणाऱ्या पाच गुंतवणूकदारांचा, कंपनीच्या ग्राहक वर्गाचे प्रतिनिधी म्हणून सत्कार करण्यात आला. यात डॉ. उमेश जोशी यांचा सत्कार 'सह्याद्री ग्रोवेट'चे संचालक नितीन हासे यांच्या हस्ते; शैला रामनाथ देशमुख (वाकचौरे) यांचा सोपानराव देशमुख यांच्या हस्ते; प्रा. सुनीलदत्त सोमनाथ कडलग यांचा युवा उद्योजक प्रवीण वाबळे यांच्या हस्ते करण्यात आला. रंगनाथ उगले यांच्या हस्ते अनिल किसनराव कडलग यांचा, तर विवेक कासार यांच्या हस्ते सुधाकर सखाराम शेटे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना डॉ. ओमप्रकाश सिकची यांनी संपत्ती निर्मितीच्या क्षेत्रात 'कडलग इन्व्हेस्टमेंट'द्वारे दिल्या जाणाऱ्या पारदर्शक, नैतिक आणि ग्राहक-केंद्रित सेवांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, आर्थिक सेवा क्षेत्राशी संबंधित जवळचे नातेवाईक असूनही, सुनील कडलग यांचे व्यावसायिक कौशल्य, सचोटी,अभ्यास आणि ग्राहकांविषयीची अढळ निष्ठा पाहून त्यांनी 'कडलग इन्व्हेस्टमेंट'ची निवड केली. आपल्या भाषणात विक्रमसिंह परदेशी यांनी नमूद केले की, ज्या काळात म्युच्युअल फंडांबाबतची जागरूकता मर्यादित होती, त्या काळात सुनील कडलग यांनी सार्वजनिक व्याख्याने, वर्तमानपत्रांमधील लेख आणि शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून सातत्याने आर्थिक साक्षरतेचा प्रसार केला. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांनी मध्यमवर्गीय कुटुंबांची आर्थिक जागरूकता आणि आर्थिक सक्षमीकरण वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असेही त्यांनी सांगितले. कडलग इन्व्हेस्टमेंटची दुसरी पिढी आदित्यच्या माध्यमातून म्युच्युअल फंड सेवा क्षेत्रात कार्यरत झाली असून तिने सेबीने नुकत्याच सादर केलेल्या स्पेशलाइज्ड इन्व्हेस्टमेंट फंड (SIF) ची अभ्यासपूर्ण विक्री व सेवा आणि सोबतच पी. एम. एस तसेच एआयएफ या विशेष उत्पादनांची तुलनात्मक व अभ्यासपूर्ण विक्री सुरू केली असल्याचे जाहीर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौरभ म्हाळस यांनी केले, तर आभार प्रदर्शन आदित्य कडलग यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापक शुभम सोमवंशी, सूरज म्हस्के, स्वाती सरमाडे, मानसी उपासनी, प्रतीक्षा सानप , आकांक्षा डोंगरे , दर्शन गुंजाळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# फिजीहून आणलेल्या काळोखेला आठ दिवसांची पोलीस कोठडी

## बहुचर्चित सिस्पे, इनफिनाईट बिकन घोटाळा

युवावार्ता (प्रतिनिधी)- अहिल्यानगर बहुचर्चित -सिस्पे, इनफिनाईट बिकन व तत्सम कंपन्यांच्या आर्थिक घोटाळा प्रकरणात फिजी येथून भारतात यशस्वीरीत्या प्रत्यार्पण करण्यात आलेल्या राहुल शामराव काळोखे याला आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून शुक्रवारी - (३१ जुलै) श्रीगोंदा येथील न्यायालयात हजर केले होते. त्याला न्यायालयाने आठ दिवसांची - पोलीस कोठडी दिली आहे. दरम्यान, या = आर्थिक घोटाळ्याप्रकरणी श्रीगोंदा, सुपा आणि तोफखाना पोलीस ठाण्यात एकुण चार गुन्हे - दाखल असून त्याचा तपास आर्थिक गुन्हे - शाखेकडून सुरू आहे. त्यांनी आतापर्यंत १३ संशयित आरोपींना अटक केली आहे.

पोलीस निरीक्षक डॉ. शरद गोर्डे तपास करीत आहेत. तपासादरम्यान संशयित आरोपींच्या आर्थिक व्यवहारांची सखोल पडताळणी करण्यात आली असून, विविध मालमत्तांचा तपशील संकलित करण्यात आला आहे. त्यानुसार सुमारे ११४ कोटी ९३ लाख रूपयांच्या मालमत्तेच्या जप्तीच्या एमपीआयडी (महाराष्ट्र ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण अधिनियम) प्रस्तावाला राज्य शासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे.

काही प्रमुख संशयित आरोपी देशाबाहेर पसार झाले होते. त्यांच्या विरोधात इंटरपोलमार्फत रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली असून, त्यांना भारतात परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांतून राहुल काळोखे याला फिजीमध्ये शोधून तेथील स्थानिक अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्याचे भारतात प्रत्यर्पण करण्यात आले. गुरूवारी त्याला भारतात आणण्यात आले व आर्थिक गुन्हे शाखेने मुंबई विमानतळावर त्याचा ताबा घेतला. त्याला शुक्रवारी (३१ जुलै) श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने सखोल तपासकामी आठ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

दरम्यान, राहुल काळोखे हा या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी अगस्ती मिश्रा याचा निकटवर्तीय व हस्तक असल्याचा आरोप आहे. त्याने आपल्या सहकाऱ्यांसह संगनमत करून गुंतवणूकदारांना अत्यंत जास्त आणि हमखास परताव्याचे खोटे आश्वासन देत विविध गुंतवणूक योजनांमध्ये पैसे गुंतविण्यास प्रवृत्त केले असल्याचा आरोप आहे.

# अजित डोवाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान



पुणे (वृत्तसंस्था)

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा पुणे दौऱ्यावर आहेत. त्यांनी या दौऱ्यात सारसबाग येथील स्मारकाला भेट देऊन लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात ते उपस्थित राहून त्यांच्या हस्ते लोकमान्य टिळक पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

अमित शहा यांच्या या दौऱ्यादरम्यान राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याचा निषेध करण्यासाठी काँग्रेस शहराध्यक्ष प्रशांत जगताप, दीप्ती चौधरी आणि माजी आमदार मोहन जोशी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात आले. याला जशास तसे उत्तर देण्याचा इशारा भाजपने दिल्याने दोन्ही पक्ष आमनेसामने आले आहेत. काँग्रेस भवनसमोर भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. काँग्रेसकडून देखील अमित शहा यांच्या निषेधार्थ 'अमित शहा गो बॅक'च्या घोषणाबाजी करण्यात आल्या. या तणावाच्या आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून अक्षय जैन, गौरव बाळंदे, सद्दाम शेख आणि राजू ठोंबरे या चार युवक काँग्रेस कार्यकर्त्यांना रात्रीच ताब्यात घेतले असून त्यांना डेक्कन पोलिस ठाण्यात ठेवण्यात आले आहे.

# नावे विचारून हिंदू मजुरांवर गोळीबार

## कुलगाममध्ये दोन जणांचा मृत्यू



श्रीनगर (वृत्तसंस्था)

दहशतवाद्यांनी दक्षिण काश्मीरमधील कुलगाममध्ये शुक्रवारी उशिरा संध्याकाळी विटभट्टीवर काम करणाऱ्या छत्तीसगडमधील दोन स्थलांतरित मजुरांना गोळ्या घातल्या. या हल्ल्यात एका मजुराचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या दुसऱ्या मजुराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा हल्ला कुलगामपासून सुमारे २० किलोमीटर दूर असलेल्या केलाम येथे झाला. मृत तरुणांची ओळख २४ वर्षीय दीपक रात्रे आणि २८ वर्षीय भूपेंद्र अशी पटली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, हा हल्ला पहलगामच्या धर्तीवर झाला आहे. प्राथमिक तपासात समोर आले की, दहशतवाद्यांनी आधी स्थलांतरित मजुरांची नावे विचारली. त्यानंतर दोन हिंदूंना गटातून वेगळे करून जवळून गोळ्या घातल्या. घटनेच्या वेळी तिथे अनेक स्थलांतरित मजूर उपस्थित होते, पण हिंदू फक्त हे दोघेच होते. दहशतवादी हल्ल्याची बातमी मिळताच सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आहे. वाहनांची तपासणी केली जात आहे. तर पोलिसांची वाहने दहशतवाद्यांच्या शोधात लागली आहेत.पोलिस सूत्रांनुसार, विटांच्या भट्टीवर रात्री सुमारे ८:३० वाजता हल्ला झाला. यावेळी ३ ते ४ राऊंड गोळीबाराचा आवाज ऐकू आला. प्राथमिक तपासानुसार, दहशतवाद्यांनी हिंदू मजुरांना लक्ष्य करण्यासाठी रेकी करून हा परिसर निवडला होता असे मानले जात आहे.

काश्मीरमध्ये ऑगस्ट ते नोव्हेंबर या काळात सफरचंद काढण्याचा हंगाम असतो. अशा परिस्थितीत, मजुरांवरील हा हल्ला येत्या काही दिवसांत बागायतदारांच्या अडचणी वाढवू शकतो. सूत्रांनी सांगितले की, तपास यंत्रणांना या हल्ल्यात एक स्थानिक आणि एक परदेशी दहशतवादी सामील असल्याचा संशय आहे. प्राथमिक तपासाचे लक्ष मोहम्मद लतीफवर आहे. तो गेल्या वर्षी लष्कर-ए-तैयबा/द रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) मध्ये सामील झाला होता. प्रकरणाचा तपास सुरू आहे. अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही.

# अमृतवाहिनी इंजि. कॉलेजच्या इनोव्हेशन सेंटरचा महात्मा फुले कृषी विद्यापीठाशी करार



**आजचे तरुण विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता, शेती आणि शेतकऱ्यांच्या वास्तववादी समस्यांवर 'एआय' सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधत आहेत, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी दाखवलेली कल्पकता आणि राहुरी कृषी विद्यापीठासोबत झालेला करार हा कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारा ठरेल. अशा नवसंशोधकांच्या पाठीशी अमृतवाहिनी संस्था सदैव भक्कमपणे उभी राहील.**

**मा. बाळासाहेब थोरात**

**(अध्यक्ष, अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्था)**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथील अमृतवाहिनी इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्यात संशोधन, नवोपक्रम व उद्योजकतेला चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर यांनी दिली.

या सामंजस्य कराराचा मुख्य भर कृषी तंत्रज्ञान क्षेत्रातील संयुक्त संशोधन तसेच इंटरनेट ऑफ थिंग्ज, कृषी रोबोटिक्स, ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग यांचा कृषी क्षेत्रातील प्रभावी वापर यावर असून विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, प्रशिक्षण कार्यक्रम तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे स्मार्ट आणि शाश्वत शेतीला चालना देण्याचे उद्दिष्ट आहे. या सहकार्यामुळे कृषी क्षेत्रातील संशोधनाला नवी दिशा मिळून नाविन्यपूर्ण कल्पनांचे उद्योजकतेमध्ये रूपांतर करण्यास मोठी मदत होईल.

अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक शाखेच्या अंतिम वर्षातील चार विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या एका 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' प्रकल्पाने कृषी तंत्रज्ञानात मोठी झेप घेतली आहे. शंतनू गमे, आयुष गायकवाड, सिद्धेश गीते आणि संयम गोडसे या तरुण संशोधकांच्या प्रकल्पामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान विश्लेषण आणि सॅटेलाईट मॉनिटरिंगचा वापर करून उसाच्या रोगांचे वेळेत निदान करणारी ही प्रणाली त्यांनी तयार केली. विद्यार्थ्यांच्या याच कल्पकतेमुळे आणि पुढाकारामुळे अमृतवाहिनी आणि महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठात महत्त्वपूर्ण करार शक्य झाला आहे. भविष्यात हे तंत्रज्ञान ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी मैलाचा दगड ठरेल.

हा महत्त्वपूर्ण सामंजस्य करार महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. व्ही. के. खर्चे यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिकृतपणे संपन्न झाला. या प्रसंगी अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'अमृतवाहिनी इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर'चे प्रमुख डॉ. डी. एस. बजाज आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संचालक (संशोधन) डॉ. पी. एस. बोडके यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी डॉ. व्ही. एस. आहेर, समन्वयक, पीएच.डी. संशोधन केंद्र, अमृतवाहिनी, डॉ. एम. बी. गुंजाळ, संगणक अभियांत्रिकी विभाग तसेच डॉ. एस. ए. कदम, कृषी अभियांत्रिकी विभागप्रमुख, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी हे मान्यवर उपस्थित होते.

# कर्जमाफीनंतर केंद्र सरकारचे शेतकऱ्यांना मोठे गिफ्ट



मुंबई (वृत्तसंस्था)

नुकताच राज्यातील महायुती सरकारकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला आहे, राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाचा फायदा राज्यातील लाखो शेतकऱ्यांना झाला असून, शेतकर्यांना कर्जमाफी मिळाली आहे. यामुळे शेतकर्यांना थोडा का होत नाही परंतु दिलासा मिळाला आहे. दरम्यान आता राज्य सरकारने घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयानंतर केंद्र सरकारने देखील शेतकऱ्यांना मोठं गिफ्ट दिलं आहे. केंद्र सरकारकडून सर्वात मोठी घोषणा करण्यात आली आहे, ज्याचा फायदा हा देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना होणार आहे.

मोदी सरकारने प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजनेला पुढील पाच वर्षांसाठी २३०-३१ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. यासाठी ३.१५ लाख कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. मोदी सरकारच्या या निर्णयाची माहिती माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. या निर्णयासोबतच कॅबिनेटमध्ये प्रधानमंत्री 'सूर्य सरोवर योजनेना' देखील मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रधानमंत्री किसान सम्मान निधीचे लाभार्थी असलेले शेतकरी सध्या या योजनेच्या २४ हप्त्याच्या प्रतीक्षेत आहेत. याचवेळी केंद्र सरकारकडून ही मोठी घोषणा करण्यात आली आहे. आता योजनेला पुढील पाच वर्षांसाठी मुदतवाढ मिळाली आहे. दरम्यान प्रधानमंत्री किसान सम्मान योजनेचा २४ वा हप्ता शेतकऱ्यांना ऑक्टोबर महिन्यात मिळू शकतो असा अंदाज देखील वर्तवला जात आहे. आतापर्यंत या योजनेंतर्गत २३ हप्त्यांच्या माध्यमातून ४.४७ लाख कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये जमा करण्यात आले आहेत. सरकारी आकडेवारीनुसार ९.४९ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना २३ व्या हप्त्याचे पैसे मिळाले आहेत. या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये महिला शेतकऱ्यांची संख्या देखील मोठी आहे. चार शेतकऱ्यांमागे एक महिला शेतकऱ्याला या योजनेचा लाभ मिळत आहे. दरम्यान आता या योजनेला पुढील पाच वर्षांपर्यंत मुदत वाढ मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचं मोठं टेन्शन दूर झालं आहे. पुढील पाच वर्ष या योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये पैसे जमा होणार आहेत. या योजनेला २०३० - २०३१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच या योजनेसाठी आता ३.१५ लाख कोटींच्या निधीची तरतूद देखील करण्यात आली आहे.








आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०



# अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. संदीप कडलग तर सचिवपदी डॉ. प्रतीक घोडके

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. सखाराम घनकुटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत डॉ. संदीप कडलग यांची अध्यक्षपदी, डॉ. प्रतीक घोडके यांची सचिवपदी तर डॉ. निलेश सहाणे यांची खजिनदारपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



सभेचे सूत्रसंचालन तत्कालीन सचिव डॉ. जयसिंग कानवडे यांनी केले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या सभेत असोसिएशनच्या आगामी वाटचालीसंदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी डॉ. अजित नवले यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून वैद्यकीय व्यवसायासोबतच समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. अकोले तालुक्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी डॉक्टरांनी एकत्रितपणे कार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. संदीप कडलग यांनी आपल्या मनोगतात रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच ग्रामीण भागात आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती उपक्रम, वैद्यकीय शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यासह डॉक्टरांसाठी स्वतंत्र 'आत्मा भवन' उभारण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

निवडणूक प्रक्रिया डॉ. विष्णू बुळे, डॉ. उल्हास कुलकर्णी आणि डॉ. सचिन नवले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पार पाडली. नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी डॉ. नितीन चासकर व डॉ. निमनाथ चौधरी, उपाध्यक्षपदी डॉ. दर्शन बंगाल, डॉ. संतोष देशमुख, डॉ. संतोष कानावडे, डॉ. रवींद्र डावरे आणि डॉ. प्रमोद कोंढवळे, सहसचिवपदी डॉ. अनुप्रिता शिंदे, स्पोर्ट्स सचिवपदी डॉ. सागर कोल्हाळ व डॉ. उज्वला वैद्य, सांस्कृतिक सचिवपदी डॉ. सतीश वाळुंज व डॉ. मंजुश्री राहणे, सीएमई समितीवर डॉ. असिफ तांबोळी, डॉ. तेजस शाह आणि डॉ. देविदास नवले, तर आत्मा ट्रिप समितीवर डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. सुनील वैद्य, डॉ. मनीषा नाईकवाडी आणि डॉ. कावेरी काकड यांची निवड करण्यात आली.

या सभेला डॉ. सुभाष सोमण, डॉ. अनिल वाघ, डॉ. उमा कुलकर्णी यांच्यासह अकोले तालुक्यातील अनेक डॉक्टर सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, आगामी काळात आरोग्य सेवा अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि समाजाभिमुख करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# मंत्रालयाच्या कँटीनमधील त्रुटी उघड

## एफडीएच्या भूमिकेवर न्यायालय नाराज

मुंबई (वृत्तसंस्था)

मंत्रालयातील कँटीनच्या स्वच्छतेबाबत अन्न व औषध प्रशासनाने सादर केलेल्या अहवालावर मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाची खरडपट्टी काढली आहे. मंत्रालयाच्या कँटीनमध्ये एकही कीटक आढळला नसल्याचा दावा एफडीएने न्यायालयात केला होता. मात्र, न्यायालयाच्या आदेशानंतर वकील आणि एफडीएच्या अधिकाऱ्यांनी मंत्रालयातील दोन्ही कँटीनची संयुक्त तपासणी केली असता तेथे माश्या, धूळ आणि स्वच्छतेतील अनेक त्रुटी आढळून आल्या.

सुनावणीदरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएवर दुहेरी निकष वापरत असल्याचा गंभीर ठपका ठेवला. खासगी आस्थापनांवर कठोर कारवाई केली जाते, मात्र सरकारी आस्थापनांबाबत वेगळी भूमिका घेतली जाते, अशी टिप्पणी न्यायालयाने केली. एफडीएने सादर केलेले तीनही तपासणी अहवाल हे कॉपी-पेस्ट स्वरूपाचे असून, ९८ टक्के स्वच्छतेचा दावा वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. मंत्रालयातील तीनही कँटीनची सुमारे ४५ मिनिटे तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये अनेक अनियमितता आढळल्याचेही न्यायालयाने नमूद केले. तपासणीनंतर मंत्रालय आणि विधानभवनातील कँटीनना आवश्यक सुधारणा करण्यासाठी नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, यापूर्वी परवाने रद्द करण्यात आलेल्या हॉटेल चालकांनाही सुधारणा करण्याची संधी देण्यात येणार असून, मंगळवारपर्यंत सुधारणा करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा तपासणी करण्यात येणार असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी ६ ऑगस्ट रोजी मुंबई उच्च न्यायालयात होणार आहे. यावेळी न्यायालयाने एफडीएसमोर दोन स्पष्ट पर्याय ठेवले. मंत्रालयाच्या कँटीनचा परवाना तात्काळ निलंबित करा किंवा केवळ किरकोळ कारणांवर खासगी हॉटेल्सचे परवाने रद्द करण्याचे आदेश मागे घ्या. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. सरकारी किंवा व्हीआयपी आस्थापनांसाठी वेगळे नियम असू शकत नाहीत, असे स्पष्ट शब्दांत न्यायालयाने सांगत एफडीए अधिकाऱ्यांकडून सविस्तर स्पष्टीकरणही मागवले आहे.

पान १ वरून -

# कर्जमाफीनंतर...

प्रथमेश उर्फ छोटू भोसले यांच्या मदतीने हा दरोडा टाकल्याची कबुली दिली. या प्रकरणातील चार आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. तपासात आरोपींनी यापूर्वी तालुका पोलीस संगमनेर ठाण्याच्या हद्दीतील एका चोरीच्या गुन्ह्याचीही कबुली दिली आहे. तसेच चोरीतील सोन्या-चांदीचे दागिने पारनेर येथील शैलेंद्र चंद्रकांत डहाळे

याला विकल्याची माहिती समोर आल्याने त्यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मुख्य आरोपी अक्षय उंबऱ्या काळे याच्याविरुद्ध अकोले, एमआयडीसी (अहिल्यानगर), बेलवंडी तसेच नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी पोलीस ठाण्यात दरोडा, चोरी आणि मोक्का कायद्यांतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून तो त्या गुन्ह्यांमध्येही फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तेजस सगड्या काळे याच्याविरुद्धही बेलवंडी पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल आहे. पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहे.




# श्रीरामपुरात एलसीबीची मोठी कारवाई

## जुगार अड्डे उद्ध्वस्त, अवैध दारूसाठ्यासह १४ लाखांचा मुद्देमाल जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने श्रीरामपूर शहर व परिसरात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या कारवाईत दोन जुगार अड्ड्यांवर छापे टाकून तसेच अवैध दारूसाठा जप्त करत एकूण तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून, सुमारे १३ लाख ९७ हजार ८३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड तसेच पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, भगवान थोरात, रमिझराजा आतार आणि विशाल तनपुरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

पहिल्या कारवाईत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७४७/२०२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये दाखल करण्यात आला. यामध्ये अरुण संजय बोरुडे (वय २८), दीपक बाळासाहेब यादव (वय २८) आणि सचिन भैरव नवले (वय ३४) यांना ताब्यात घेण्यात आले असून, स्वामी परदेशी व अश्पाक जाहागिरदार हे दोघे फरार आहेत. या कारवाईत १ लाख ४५ हजार ९०० रुपयांचा रोख रक्कम, मोबाईल, जुगाराचे साहित्य व वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दुसऱ्या कारवाईत गुन्हा क्रमांक ७४८/२०२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये रविंद्र महादेव गायकवाड (वय ३०) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणातही अश्पाक जाहागिरदार हा फरार असून, ७ लाख ३३ हजार ५०० रुपयांचा रोख रक्कम, मोबाईल, जुगाराचे साहित्य व वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तिसऱ्या कारवाईत गुन्हा क्रमांक ७४९/२०२६ महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) अन्वये नितेश अमरीकलाल कंत्रोड (वय ४३, रा. जयभोले चौक, गोंधवणी रोड, श्रीरामपूर) याच्याकडून देशी-विदेशी दारूच्या बाटल्या व वाहन असा ५ लाख १८ हजार ४३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या तिन्ही कारवायांमध्ये एकूण तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून आठ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी काही आरोपी फरार असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत. जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधातील कारवाया यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# भोंदू अशोक खरात शिर्डी पोलिसांच्या ताब्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - राहाता येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेत बोगस खाती उघडून आर्थिक व्यवहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेला आरोपी अशोक खरात याला शिर्डी पोलिसांनी नाशिक मध्यवर्ती कारागृहातून ताब्यात घेतले आहे. न्यायालयाची परवानगी घेतल्यानंतर त्याला पुढील तपासासाठी शिर्डी पोलिस ठाण्यात आणण्यात आले आहे. तेथे त्याची सखोल चौकशी सुरू आहे.



आज राहाता न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत बनावट कागदपत्रांच्या आधारे काही व्यक्तींच्या नावाने खाती उघडण्यात आल्याचा आरोप आहे. या खात्यांमधून मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याची बाब तपासात समोर आल्यानंतर शिर्डी पोलिसांनी अशोक खरात व संबंधित शाखा व्यवस्थापकासह अन्य संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. तपासादरम्यान अनेक खातेदारांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. काहींनी आपल्या नावाने खाते उघडल्याची माहिती नसल्याचे सांगितले 'असून, त्याआधारे पोलिसांकडून कागदपत्रे, केवायसी प्रक्रिया आणि व्यवहारांची पडताळणी केली जात आहे. अशोक खरात याला ताब्यात घेतल्यानंतर या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांचे नेमके स्वरूप, बोगस खाती उघडण्यामागील सूत्रधार, व्यवहारात सहभागी असलेले इतर संशयित तसेच पतसंस्थेतील अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची भूमिका याबाबत चौकशी केली. जाणार आहे.

# कंजारभाट समाजातील लाभार्थ्यांना जातीचे दाखले प्रदान, पाठपुरावा ठरला यशस्वी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-भटक्या विमुक्त कंजारभाट समाजातील नागरिकांना जातीचे दाखले मिळावेत यासाठी करण्यात आलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी येथील मालपाणी लॉन्स येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत कंजारभाट समाजातील घुलेवाडी येथील लाभार्थ्यांना प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते जातीचे दाखले प्रदान करण्यात आले.

समाजातील एकही नागरिक जातीच्या दाखल्यापासून वंचित राहू नये, या उद्देशाने ७० ते ७५ जातीच्या दाखल्यांसाठी प्रस्ताव प्रशासनाकडे सादर करण्यात आले होते. भटक्या विमुक्त आदिवासी संयोजन समितीचे मार्गदर्शक संदीप आखाडे व रवी दिवे, सुनिल अभियेकर सर, विमल सावंत, कोमल इंद्रेकर, विशाल इंद्रेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

तहसीलदार धीरज मांजरे यांनी तातडीने संबंधित प्रशासकीय यंत्रणेला आवश्यक सूचना दिल्या तसेच नायब तहसीलदार अनुप गिरी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

या कामासाठी ग्रामसेवक चांगदेव दरेकर, तलाठी अप्पा सावळे, सरपंच सौ. निर्मलाताई राऊत, उपसरपंच अनिल राऊत, माजी उपसरपंच दत्तू राऊत, तंटामुक्त अध्यक्ष बाळासाहेब पानसरे, सोसायटी चेअरमन भाऊसाहेब पानसरे, ग्रामपंचाय सदस्य बाजीराव पानसरे, सोनाली गिरी, रवीभाऊ दिवे, हरी ढमाले, किशोर आव्हाड तसेच श्री साईनाथ तरुण मित्र मंडळ भाटनगर मधील कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.

जातीच्या दाखल्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुनिल अभिसिंग अभियेकर व विशाल राहुल इंद्रेकर यांनी परिश्रम घेत मार्गदर्शन केले. त्यांच्या नेतृत्वामुळे हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला.

महाराष्ट्र शासनाने भटक्या विमुक्त समाजातील नागरिकांना न्याय देण्याच्या दृष्टीने घेतलेल्या सकारात्मक निर्णयामुळे अनेक कुटुंबांना आता शिक्षण, रोजगार आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग खुला झाला आहे. जातीचे दाखले मिळाल्याने कंजारभाट समाजातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, समाजाच्या विकासासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# अकलापूर देवस्थानाला 'ब' वर्ग दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न करणार- आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अकलापूर येथील जागृत श्री दत्त महाराज देवस्थानाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. तसेच देवस्थानाला लवकरात लवकर 'ब' वर्गाचा दर्जा मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असा ठाम विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

गुरुपौर्णिमेनिमित्त आमदार खताळ यांनी अकलापूर येथील जागृत श्री दत्त महाराजांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, शैलेश फटांगरे, जनार्दन कोकाटे, जयदास गायकवाड, संतोष गायकर, शिवाजी तळेकर, अमित शेळके, नामदेव गायकवाड, लहू आभाळे, सचिन आभाळे, अमोल कापसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



आमदार खताळ म्हणाले की, आमदार होण्यापूर्वी हिवरगाव पावसा येथील देवगड खंडोबा देवस्थानाला 'क' वर्गाचा दर्जा मिळाला होता. मात्र आमदार झाल्यानंतर शासन स्तरावर विशेष पाठपुरावा करून त्या देवस्थानाला 'क' वर्गातून 'ब' वर्गाचा दर्जा मिळवून देता आला. त्याच धर्तीवर अकलापूर येथील श्री दत्त महाराज देवस्थानालाही 'ब' वर्गाचा दर्जा मिळण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती सर्व मदत व पाठपुरावा करण्यात येईल.

ते पुढे म्हणाले की, श्री दत्त महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर नेहमीच एक वेगळी ऊर्जा मिळते. त्या ऊर्जेच्या बळावर जनतेच्या सेवेसाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते. तसेच अकलापूर येथील बैलगाडा शर्यतीसाठी आवश्यक असलेल्या घाटाचे कामही लवकरात लवकर सुरू करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

## संपादकीय...

# सलोखा, सामंजस्य आणि ऐकता गरजेची

आंतरराष्ट्रीय मैत्री दिन सर्व संस्कृतींमध्ये मैत्रीची भूमिका बजावण्याचा प्रयत्न करतो. हा विशेष दिवस साजरा करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र समुदाय गट, संस्था आणि सरकारांना सलोखा, परस्पर समंजसपणा आणि एकता यांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रोत्साहित करते. युनायटेड नेशन्स जनरल असेंब्ली (यूएन.) द्वारे आंतरराष्ट्रीय मैत्री दिन ३० जुलै नियुक्त केला गेला. सर्व समुदाय आणि संस्थांना आम्ही आमच्या जवळ असलेल्या मैत्रीचा उत्सव साजरा करणाऱ्या कार्यक्रमांचे समन्वय साधण्यासाठी प्रोत्साहित करते. बऱ्याच इव्हेंटमध्ये सलोखा निर्माण करणे, समजूतदारपणा आणि सहमती निर्माण करणे आणि घरासारखे वाटत असलेल्या मैत्रीमध्ये सांत्वन मिळवणे यावर लक्ष केंद्रित केले जाते.

मित्र-मैत्रिणी एकमेकांना भेटणं या इतकी आनंदाची गोष्ट दुसरी कोणतीच नसेल. आपल्या आयुष्यात वेगवेगळ्या वळणावर भेटणार्या व्यक्ती त्यातील काहींशी आपली मैत्री अगदी दृढ होते. पण या प्रत्येक वळणावरील मैत्रीचे कंट्रिब्यूशन आपल्या जीवनात खूप मोलाचे असते. ते आपण कधीच विसरू नये. लहानपणी शाळेतील मित्र-मैत्रिणी अढी-अबोला अधिक काळ ठेवत नाहीत. किती निरागस असते नाही, ही मैत्री! मुलं-मुली एकत्र आनंदाने खेळतात, रुसतात, फुगतात, पुन्हा भांडण विसरून जातात. लगेचच कट्टीची गट्टी होते. पुढे तारुण्यातील मैत्री ही काही वेगळीच! या वयात ज्यांच्याशी आपल्या विचारांची तार जुळते त्यांच्याशीच मैत्री होते. तारुण्यातल्या मैत्रीत खूप मजा असते, आपण तारुण्यात कोणाची कदर करत नसतो कारण या वयातील मैत्री तशी थोडी वरवरचीच असते. टिकली तर टिकली, नाहीतर फेकली वरचे वर!. आपण आपल्या विश्वात रमून जातो. आपलं विश्व त्यावेळी डबक्या सारखं असतं. विशाल सागराचा आपण त्या वेळी विचारच केलेला नसतो, पण जेव्हा पन्नाशीत पोहोचतो तेव्हा कधी डबकं सोडून सागराला मिळालेले असतो हे कळतसुद्धा नाही. जेव्हा पन्नाशीच्या सागरात मित्र-मैत्रिणी भेटतात तेव्हा सगळ्या नात्यात ते मैत्रीचं नातं इतकं आपलंसं वाटत असतं कि ती मैत्री खूप हवीहवीशी वाटते. नात्यापेक्षा मैत्रीचा आधार खूप हवासा वाटतो. मैत्रीत खूप मोकळेपणा असतो. आपली विचारांची तार जुळत असेल तर काहीही आडपडदा न ठेवता आपण मित्र-मैत्रिणींशी सर्वकाही शेअर करतो. जो आपल्याला समजून घेतो व आपल्या हाकेला ओ देतो तोच खरा मित्र समजतो. आयुष्याच्या संध्याकाळी सुद्धा असे मित्र मैत्रिणी भेटतात. आपण कोणीच कोणाचे नसतो. पण आपले काहीतरी ऋणानुबंध असतात, म्हणूनच आपली भेट त्या व्यक्तीशी होते. कविता साक्षी आहे- ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी! स्त्री-पुरुष मैत्री ही आणखी एक निराळीच गोष्ट आहे. ही समाजाला बोचते. भिन्नलिंगी मैत्री ही दूषितच असते, असं समजलं जातं. एखाद्याचे तसे असेलहि. पण म्हणून सब घोडे बारा टक्के या चालीवर हे समजू नये. कितीतरी अशा व्यक्ती आहेत की ज्या निखळ सच्ची मैत्री करतात. त्यांना ही मैत्री आनंद देते. हे मैत्रीचे नाते लगेचच प्रेमसंबंधाशी जोडू नये. हा मनाचा कोतेपणा आहे. मुद्दाम कोणी अशी मैत्री शोधायला जात नाही. काही वेळा ती सहजच घडते. काही माणसं थोड्या सहवासानेहि आपलीशी वाटतात. आपण त्यांच्या स्वभावाच्या प्रेमात पडतो, त्यांचा सहवास हवाहवासा वाटतो. ज्यांना अशा व्यक्ती भेटतील तर त्या त्यांनी अवश्य जपाव्यात. सगळ्यांनाच हे भाग्य लाभत नाही. जीवन आनंदी होण्यासाठी मैत्री कारणीभूत ठरते, अशी ही मैत्री आहे. मोगर्याच्या फुलाचा सुगंध आपल्याला हवा हवासा वाटतो. तो लपवता येत नाही.

# अमृतवाहिनीत AI आधारित राष्ट्रीय प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथील संगणक अभियांत्रिकी विभागामार्फत आयोजित करण्यात आलेला ISTE-BNY One Week Online Faculty Enhancement Program (FEP) अंतर्गत AI-Powered Digital Tools for Teaching and Research Skills या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील एक आठवड्याचा ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम दि. १५ ते २१ जुलै २०२६ या कालावधीत संपन्न झाला.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (ISTE), नवी दिल्ली यांच्यामार्फत १,२५,०००/- चे अनुदान अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयास मंजूर झाले होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, दिल्ली आणि तामिळनाडू या देशातील १० विविध राज्यांतील प्राध्यापक, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमामुळे राष्ट्रीय स्तरावर ज्ञान, अनुभव आणि आधुनिक एआय तंत्रज्ञानाची प्रभावी देवाणघेवाण घडून आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन ISTE चे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रावसाहेब लटपटे, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी शिक्षकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञान आत्मसात करून संशोधन आणि अध्यापन अधिक परिणामकारक करण्याचे आवाहन केले.

संपूर्ण आठवडाभर विविध क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये डॉ. मनेश कोकारे, डॉ. प्रतिमा खंडेलवाल, डॉ. सतीश पोलशेट्टीवार, डॉ. दिप्ती पाटील, श्री. तुषार कुटे, डॉ. निलांजन डे, श्री. देवाशीष लांबोरे, डॉ. निलेश उके, श्री. तन्मय दीक्षित, डॉ. महेश संघवी, डॉ. शुभदा नगरकर, डॉ. वैभव हेंद्रे, डॉ. महेश कोलेकर, कृष्ण धन प्रभू, डॉ. श्रीनिवास सोनकर, डॉ. रमेश पावसे आणि डॉ. मुबीन तांबोळी यांनी एआय आधारित अध्यापन, संशोधन लेखन, प्रकाशन नैतिकता, साहित्य सर्वेक्षण, एआय Tools, डेटा विश्लेषण, डिजिटल कंटेंट निर्मिती, संशोधनातील आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध -ख प्लॅटफॉर्मच्या प्रभावी वापरावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. एम. ए. वाकचौरे होते. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस. के. सोनकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

समारोप समारंभास प्रा. विजय वैद्य, ISTE-BNY Project Coordinator, New Delhi हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर यांनी या उपक्रमामुळे देशभरातील शिक्षकांना एआय आधारित आधुनिक अध्यापन व संशोधन कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाल्याचे सांगितले.

हा राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महसूल मंत्री मा. आ. बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीरजी तांबे, सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडेमिक्स डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे तसेच सर्व विभागप्रमुखांनी आयोजन समितीचे अभिनंदन केले.

# नीरजचे रौप्य, यशवीरचे कांस्य

## भालाफेकीत भारताची दुहेरी कमाई




मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताच्या भालाफेकपटूंनी शानदार कामगिरी करत पुरुषांच्या भालाफेक प्रकारात दोन पदके जिंकली. शुक्रवारी रात्री उशिरा झालेल्या अंतिम फेरीत नीरज चोप्राने रौप्यपदक, तर यशवीर सिंगने कांस्यपदक आपल्या नावावर केले. श्रीलंकेच्या रुमेश थरंगा पाथिराजाने सर्वाधिक ८९.७५ मीटर भालाफेक करत सुवर्णपदक पटकावले. ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्राने स्पर्धेची सुरुवात ८०.९७ मीटर फेकीने केली. त्यानंतर दुसऱ्या प्रयत्नात त्याने ८५.८३ मीटर अंतर गाठत हंगामातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. पुढील प्रयत्नांमध्ये त्याने ८१.२९ मीटर आणि ८०.७३ मीटर अशी फेक केली. मात्र, श्रीलंकेच्या रुमेश पाथिराजाच्या दमदार कामगिरीमुळे नीरजला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

यशवीर सिंगनेही स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी केली. सुरुवातीच्या प्रयत्नांनंतर त्याने सातत्याने आपली कामगिरी उंचावली. अखेरच्या प्रयत्नात त्याने ८५.४१ मीटर अंतर गाठत कांस्यपदक जिंकले. विशेष म्हणजे ही त्याच्या कारकिर्दीतील वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ठरली. भारताचा आणखी एक खेळाडू रोहित यादवने ८१.५६ मीटर अंतर गाठत स्पर्धेत सातवे स्थान मिळवले. त्यानेही काही चांगल्या फेकी करत अंतिम क्रमवारीत स्थान मिळवले.

या यशानंतर भारताची २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदकसंख्या २३ वर पोहोचली आहे. भारताने आतापर्यंत ५ सुवर्ण, १२ रौप्य आणि ६ कांस्य पदके जिंकली आहेत. थलेटिक्स आणि पॅरा-थलेटिक्समध्ये मिळून ११ पदके मिळाली असून, ज्युडोमध्ये ३, वेटलिफ्टिंगमध्ये ८ आणि पॅरा-पॉवरलिफ्टिंगमध्ये १ कांस्यपदक भारताने जिंकले आहे. सध्या पदकतालिकेत भारत १० व्या स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया १२८ पदकांसह अव्वल स्थानावर असून इंग्लंड दुसऱ्या आणि कॅनडा तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्पर्धेतील सर्वात मोठे आश्चर्य यशवीर सिंग ठरले. त्यांनी शेवटी ८५.४१ मीटरचा वैयक्तिक सर्वोत्तम थ्रो करून कांस्यपदक जिंकले. पाकिस्तानचे ऑलिम्पिक चॅम्पियन अर्शद नदीम टॉप-८ मध्येही स्थान मिळवू शकले नाहीत आणि तीन फेऱ्यांनंतर बाहेर पडले.

पान १ वरून -

# याचिका केवळ...

अभियंता प्रदीप वट्टमवार, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके, सहाय्यक वनसंरक्षक अमरजीत पवार, भाजप ज्येष्ठ नेते भीमराज चत्तर, शेतकरी नेते संतोष रोहम, शिवसेना जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे, तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे, शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी, सौ. पायल ताजणे, भाजपचे राऊफभाई शेख, गुलाब भोसले, वैशाली राऊत, साक्षी सूर्यवंशी, सौरभ देशमुख, सुशील शेवाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते महसूल, कृषी, पंचायत समिती, वनविभाग या विभागांच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राचे लाभार्थींना वितरण करण्यात आले.

आमदार खताळ म्हणाले की , काही जण न्यायालयाने याचिका सुनावणीसाठी स्वीकारल्याचा चुकीचा अर्थ लावत आहेत. प्रत्यक्षात अंतिम निर्णय अद्याप झालेला नसतानाही पुन्हा आमदार किंवा मुख्यमंत्री होण्याची स्वप्ने पाहिली जात आहेत. मात्र वास्तव वेगळे आहे. मी अवघा दोन वर्षांचा असताना तुम्ही संगमनेरचे आमदार होता. आज बेचाळीस वर्षांच्या तरुणाला जनतेने निवडून दिले आहे. हा पराभव कोणत्याही व्यक्तीने केलेला नसून, संगमनेरच्या जनतेने आणि नियतीने केलेला आहे. माझा न्यायपालिकेवर संपूर्ण विश्वास आहे. न्यायालयात सत्याचाच विजय होईल. त्याचबरोबर संगमनेरच्या मायबाप जनतेच्या आशीर्वादामुळे माझाही विजय निश्चित होईल, याची मला पूर्ण खात्री आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

### जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, अहिल्यानगर

पत्ता:- सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्सच्या शेजारी अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर-४१४००३

Website: www.mahawakf.com Dwoahilyanagar@mahawakf.com

संचिका क्र. ADR/213

क्र. वक्फ/अहिल्यानगर/चौकशी/ 149 /2026
दिनांक - 24/07/2026

**(जाहिर प्रगटन)**

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.

वक्फ संस्थेच नाव व पत्ता: - Samast Musalman Masjid-O-Muslim Kabrastan, At. Ranjangaon Deshmukh Tq. Kopergaon Dist. Ahilyanagar.

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य मंडळात क्र. MSBW/ADR/496/2018 अन्वये नोंदणीकृत असुन अर्जदार सुभान अली हसन सय्यद व इतर यांनी दि. २२/०७/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या बहुमताने नवीन सदस्यांची नियुक्ती करतील, योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | सुभानअली हसन सय्यद | अध्यक्ष |
| २ | नवाज जलालभाई सय्यद | उपाध्यक्ष |
| ३ | बिलाल बाबुलाल सय्यद | सचिव |
| ४ | फारूक इस्माईल सय्यद | खजिनदार |
| ५ | शब्बीर रसुल सय्यद | सदस्य |
| ६ | चाँदभाई शरपुद्दीन सय्यद | सदस्य |
| ७ | शाविद सुनिल सय्यद | सदस्य |
| 8 | शहेबाज महंमद सय्यद | सदस्य |
| 9 | सुभान गुलाब सय्यद | सदस्य |
| 10 | सलमान शाहाद्दीन सय्यद | सदस्य |
| 11 | इब्राहीम महमंद सय्यद | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यस संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत. जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर पत्ता- सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्सच्या शेजारी अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर ४१४००३ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

जिल्हा वक्फ अधिकारी
अहिल्यानगर

**नावात दुरूस्ती**

मी धुमाळ सुमित कैलास
रा. जवळे कडलग
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
प्रतिज्ञापत्राद्वारे जाहीर करतो की,
माझे आधारकार्डवर
सुमीत कैलास धुमाळ असे
नाव असून शाळेच्या दाखल्यावर
धुमाळ सुमित कैलास असे आहे.
तरी दोन्ही नावाच्या व्यक्ती
एकच आहे

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
BABU AMIRKHAN PATHAN
NEW NAME AS
MEHTAB AMIRKHAN PATHAN
ADDRESS:- 195, JORVE ROAD, EKTA NAGAR, SANGAMNER, Ahmednagar Maharashtra 422605

**पाहिजेत**

कापड दुकानासाठी
सेल्समन- २ जागा (पुरूष)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(कामाची वेळ सकाळी १० ते रात्री १०/ पार्ट टाईम)
(अनुभवास प्राधान्य व आकर्षक पगार)
मेन्स स्टुडिओ
नाशिक-पुणे हायवे लॉ कॉलेज समोर, संगमनेर
8830437076
9822882399

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
MEENAZ SHAIKH SALIM
NEW NAME AS
MINAJ SAMIR MANIYAR
ADD - DAVTHAN
TAL- AKOLE
DIST - AHMEDNAGAR

**पाहिजेत**

एक पुरुष कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
– संपर्क –
7972999316

**पाहिजेत**

क्षितिज इलेक्ट्रीकल
घुलेवाडी, ता. संगमनेर
अनुभवी अकाऊंटट पाहिजे - २ जागा
(पुर्णवेळ)
MS Offics Tally
ज्ञान आवश्यक
– संपर्क –
7007608875

**पाहिजेत**

मोरया टॉइज व गिफ्ट शॉप
दुकान कामासाठी
होतकरु कामगार पाहिजे
शिक्षण– किमान १० वी
पत्ता– पोफळे मळा, अभंग पेट्रोल पंप समोर
9767880009

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५८९/२०२६
दिनांक - २९/०७/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. अब्दुल हमीद कुरेशी रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १४/०७/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची मुलगी नामे आयशा अब्दुल हमीद कुरेशी यांचा **जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक १९/११/२०२०** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**पाहिजेत**

दुकान कामासाठी
होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

**फ्लॅट विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम,
स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

**पाहिजेत**

श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
8080548282
7498749500

**पाहिजेत**

पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
– संपर्क –
8888808397







**फॅकल्टी पाहिजे** अगस्ती अकॅडमी संगमनेर

ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
**पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स**
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
**AMVI – 461 जागा MPSC** (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू

| | | | | |
|---|---|---|---|---|
| MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा |

अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन

पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जड्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# नाशिकला रेड अलर्ट

## नागरिकांना घराबाहेर न पडण्याचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - भारतीय हवामान विभागाने नाशिक जिल्ह्यासाठी अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने व्यापक खबरदारीचे उपाय हाती घेतले आहेत. संभाव्य अतिवृष्टी, ढगफुटीसदृश परिस्थिती, पूर, भूस्खलन आणि इतर नैसर्गिक आपत्तींचा धोका लक्षात घेऊन जिल्ह्यात एनडीआरएफचे पथक तैनात करण्यात आले असून, शनिवार (१ ऑगस्ट) रोजी आठ तालुक्यांतील सर्व शाळा, अंगणवाड्या आणि महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत आदेश जारी करत मालेगाव, नांदगाव, बागलाण, कळवण, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, पेठ आणि सुरगाणा या तालुक्यांतील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, अनुदानित, विनाअनुदानित, खासगी शैक्षणिक संस्था तसेच सर्व महाविद्यालयांना सुटी जाहीर केली आहे. मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनेनुसार आवश्यकतेनुसार उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. नदी, नाले, ओढे, धरणे, तलाव, जलाशय, पूल, घाट परिसर, गड-किल्ले, डोंगर उतार आणि भूस्खलन संभाव्य भागात जाणे टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील सर्व धबधबे, ट्रेकिंग पॉईंट्स, नदीकाठ, पर्यटनस्थळे आणि पूरप्रवण धार्मिक स्थळे पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित क्षेत्र घोषित करण्यात आली असून, नागरिकांना तेथे जाण्यास मनाई करण्यात आली आहे. महसूल, पोलीस, वन विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना या ठिकाणी बॅरिकेडिंग करून प्रवेश रोखण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच आठवडी बाजार, जत्रा, मेळावे आणि मोठ्या सार्वजनिक गर्दीचे कार्यक्रमही स्थगित करण्यात आले आहेत. सखल व पूरप्रवण भागातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर, निवारा केंद्रांची उभारणी, अन्न, पिण्याचे पाणी, औषधे व अन्य मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. आरोग्य विभागाला सर्व रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यास सांगण्यात आले असून, पूरप्रवण भागातील उच्च जोखमीच्या गर्भवती महिलांना आवश्यकतेनुसार सुरक्षित आरोग्य संस्थेत दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पशुसंवर्धन विभागाला जनावरांच्या स्थलांतराची व चारा-पाण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महावितरणला धोकादायक भागात आवश्यकतेनुसार वीजपुरवठा सुरक्षिततेच्या दृष्टीने नियंत्रित करण्याचे, तर दूरसंचार कंपन्यांना मोबाईल व इंटरनेट सेवा अखंडित ठेवण्यासाठी आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# संगमनेरमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे अद्ययावत स्मारक उभारणार - मा. आ. डॉ. सुधीर तांबे




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दलित, शोषितांचा आपल्या साहित्यामधून आवाज बुलंद करताना त्यांच्या हक्कांसाठी लढणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साहित्यातून मोठी क्रांती केली. मानवतेसाठी व समतेसाठी त्यांनी आवाज उठवला. त्यांचे विचार हे सदैव प्रेरणादायी असून लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या पुढाकारातून संगमनेर शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे अद्यावत स्मारक लवकरात लवकर साकारण्यात येणार असल्याचे मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांनी म्हटले आहे.

संगमनेर हायटेक बसस्थानकासमोर मातंग एकता समाज व सकल मातंग समाजाच्या वतीने १०६ व्या जयंती निमित्ताने आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. याचबरोबर लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मातंग एकता आंदोलनाचे अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार विजेते ज्ञानेश्वर राक्षे, नगरसेवक गजेंद्र अभंग, प्रा.बाबा खरात, नितीन अभंग, संतोष गायकवाड, उत्तर महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक प्रा.प्रदीप पाटील,संदीप आव्हाड, राजेंद्र आव्हाड, दत्ता लाहुंडे, किशोर साळवे, सचिन शेलार, विजय आव्हाड,देवेंद्र साळवे, विकी साळवे, संजय जमधडे, व्हि.डी.सरकार, विकी पवार, मनीष राक्षे,बाबासाहेब साळवे, विश्वनाथ आल्हाट, दीपक खरात, डी. के. जाधव, संजय शिंदे, सोनू गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, काँग्रेस सेवादलाचे जीवन पांचारिया यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयातही अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना माजी आमदार डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे मोठे योगदान राहिले आहे. बहुजन समाजाच्या न्याय हक्कासाठी अण्णाभाऊ साठे यांनी संघर्ष केला. आपल्या साहित्यामधून क्रांतीज्योत पेटवली. समता व मानवतेचे त्यांचे विचार राज्यघटनेमध्ये आले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली राज्यघटना ही आपल्या सर्वांसाठी महत्त्वाची आहे. मात्र आज दररोज राज्यघटनेची पायमल्ली होत आहे. काही मूठभर लोक बहुजनांना वंचित ठेव पाहत आहेत. सर्वांनी एकजूट करून आता लढले पाहिजे.

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून समतेचा विचार आहे. मानवता हा एकच धर्म खरा आहे आणि तो जोपासण्यासाठी आपण काम केले पाहिजे अन्यथा येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य अंधारात असेल. संगमनेर शहरांमध्ये बस स्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्ण कृती पुतळा, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक होणार आहे.

### संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊंचे योगदान - माजी मंत्री थोरात

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या सशक्त लेखणीमधून कष्टकरी, श्रमिक आणि वंचितांच्या वेदना मांडल्या. फकीरा या लोकप्रिय कादंबरी सह ३५ कादंबऱ्या तसेच ३०० कथा लिहिल्या. त्यांचे साहित्य केवळ मराठी भाषेपुरते मर्यादित न राहता १४ भारतीय भाषा तसेच जर्मन, इंग्रजी, पोलीश, रशियन इत्यादी परकीय भाषांमध्ये सुद्धा भाषांतरित करण्यात आले आहे. त्यांचे साहित्य व विचार महाराष्ट्रातील तरुणांसाठी सदैव प्रेरणादायी असून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्यांचे मोठे योगदान राहिले असल्याचे काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.**

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# पाऊस समाधानकारक

## अनेक ठिकाणी पाणी टंचाईसह टँकरही दूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जुलै महिन्यात तालुक्यात सर्वदूर झालेल्या पावसामुळे अनेक गावांमधील पाणी टंचाई दूर झाली आहे. त्यामुळे पाच टँकर देखील बंद करण्यात आले आहे.

सध्या १९ गावे, ४८ वाड्यांना १७ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. यंदा पाऊस उशिराने पडल्याने पाणीटंचाई जाणवत होती. यामुळे मार्च महिन्यातच काही गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला होता. तर एप्रिलमध्ये ही संख्या वाढली. जून अखेर ३१ गावे व ७५ वाड्यांना २२ टँकरने पाणीपुरवठा सुरू होता. मात्र जुलै महिना सुरू होताच संगमनेर तालुक्यात अनेक भागात दमदार पावसाने हजेरी लावली. चार ते पाच दिवस सलग पाऊस सुरू होता. या पावसाने मोठा दिलासा मिळाला असून जवळपास ९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. दरम्यान जे टँकर सुरू आहेत त्यात शासकीय ४ व खाजगी १३ टँकरचा समावेश आहे. डोळसणे, पिंपळगाव देपा, खंडेरायवाडी, चौधरवाडी, कुंभारवाडी, वरवंडी, कर्जुले पठार, गुंजाळवाडी, पठार, दरेवाडी, कौठे मलकापूर, हिवरगाव पठार, जांभूळवाडी, पारेगाव बुदुक, रणखांब वाडी, साकुर, बिरेवाडी व अकलापूर अशी गावे व या गावांतर्गत येणाऱ्या विविध वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. तर २७ हजार दोनशे ४९ नागरिक या पाण्यावर अवलंबून आहे. सध्या कुठल्याही नवीन गावाचा टँकरचा प्रस्ताव आलेला नाही. जर पाऊस असाच सुरू राहिला तर आणखीही पाण्याचे टँकर कमी होण्याची शक्यता आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
आकर्षक लुक्ससाठी ट्रेंडी लेडीज़ सूट्स
सेले नव्हे होलसेल सेल 30% ते 70%
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25


अकोले तालुक्याचा बुलंद आवाज
तसेच नूतन भाजपा
महिला मोर्चा महाराष्ट्र राज्य
"प्रदेश सचिव"
BJP
अकोले नगरपंचायत
नगराध्यक्षा पदी
सौ. सोनालीताई
चेतन नाईकवाडी
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
-शुभेच्छुक -
भारतीय जनता पार्टी, अहिल्यानगर
मा. चेतन नाईकवाडी मित्र मंडळ, अकोले